**जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांचे कार्यालय, अकोला**
जिल्हा न्यायालय परिसर, रेल्वे स्टेशनरोड, अकोला-४४४००१
दूरध्वनी क्र.०७२४-२४१०१४५ई-मेल akoladlsa@gmail.com dlsaakola@gmail.com

जा.क्र.:६०० /२०२५
दिनांक :- ०३/११/२०२५

**जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अकोला मार्फत अधिकार मित्र/ विधी स्वयंसेवक निवडी करीता अर्ज मागविण्यात येत आहेत**

मा. राष्ट्रिय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या अधिकार मित्र/विधी स्वयंसेवक योजने अंतर्गत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अकोला येथे ४०, तसेच तालुका **विधी सेवा समिती, अकोट-१५, तेल्हारा-१०, बाळापुर-१०,** पातुर-१०, बार्शिटाकळी-१०, **मुर्तिजापुर-१०, येथे अधिकर मित्र/ विधी स्वयंसेवकांची** एक वर्षा करीता निवड **करावयाची आहे.** करीता अकोला जिल्हयातील रहिवासी असलेल्या महिला/पुरुष नागरीकांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

अधिकार मित्र/विधी स्वयंसेवक यांच्या पात्रते संबंधी तसेच योजनेच्या सविस्तर माहिती करीता **www.nalsa.gov.in** या संकेतस्थळा वर जाऊन त्यामधील Act Rules या मेनु मधील preventive & Strategic Legal Services Scheme मधील Scheme for Para Legal Volunteers या योजने वरील सविस्तर माहिती पहावी.

अधिकार मित्र/विधी स्वयंसेवक यांना प्राधिकरणा कडून दिलेल्या कामा बाबत, त्यांनी दिलेल्या सेवेचे नियमा प्रमाणे व मा. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यानी दिलेल्या नियमा नुसार मानधन अनुज्ञेय राहील. त्यांना मानधना शिवाय कोणत्याही प्रकार चे वेतन, मोबदला अथवा मजुरी देण्यात येणार नाही. तरी अधिकर मित्र/विधी स्वयंसेवक म्हणुन सेवा देण्यास इच्छुक असलेल्या अकोला जिल्हयातील शिक्षक व सेवा निवृत्त शिक्षक, सेवा निवृत्त शासकीय कर्मचारी, वरिष्ठ नागरीक, समाजकार्याचे शिक्षण घेणारे विद्यार्थी,व शिक्षक, अंगणवाडी कार्यकर्ती, डॉक्टर्स, विधी महाविद्यालयात शिक्षण घेणारे विद्यार्थी, सेवा पुरविणा-या स्वयंसेवी संस्थांचे/महामंडळाचे अराजकीय सदस्य, स्वयं मदत/बचत गटातील किंवा महिलांच्या इतर गटातील महिला/इच्छुक साक्षर नागरीक ज्यांचे नावे कोणत्याही प्रकारच्या फौजदारी गुन्हयांची नोंद नाही अशा व्यक्ती, सामाजिक कार्यकरण्यास इच्छुक नागरीकांना अर्ज सादर करता येतील.

तरी अकोला जिल्हयातील नागरिकांनी फोटो, शैक्षणिक दस्तऐवज, रहिवासी प्रमाणपत्र, संपर्क क्रमांक तसेच जिल्हा स्तरावर, तालुका स्तरावर अकोट /तेल्हारा /बाळापुर /पातुर /बार्शिटाकळी /मुर्तिजापुर येथे सेवा देण्यास इच्छुक आहे असे स्पष्ट लिहिलेले बायोडेटा सहित **अर्ज मा. अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अकोला यांचे** नावे **जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, 'न्याय सेवा सदन' जिल्हा न्यायालय, अकोला येथे** दिनांक **१५/११/२०२५ सांयकाळी ५.३० वाजे पर्यत किंवा त्याआधी प्रत्यक्ष सादर करावेत.** याची नोंद घ्यावी.

अर्जाचा नमुना यासह जोडण्यात आला आहे.

..................................................................................................

## महत्वाच्या सुचना

१. अर्जदारा विरूध्द कोणत्याही न्यायालयात फौजदारी प्रकरण चालु किंवा प्रलंबीत नसावे. कोणत्याही प्रकारचे प्रकरण प्रलंबीत नसल्याबाबत चे स्वसाक्षांकित हमीपत्र अर्जदारास सादर करणे आवश्यक राहील.

२. नियुक्ती नंतर विधी स्वयंसेवक याच्यावर फौजदारी प्रकरण कोणत्याही न्यायालयात दाखल झाल्यास त्याबाबत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अकोला या कार्यलयास सुचना देण्याची जबाबदारी विधी स्वयंसेवकाची राहील, सुचना न दिल्यास होणा-या कार्यवाहीस तो अधिकार मित्र /विधीस्वयंसेवक पात्र राहील.

३. सदरहु जाहिरातीचे अनुसार प्राप्त होणा-या अर्जांची छानणी/तपासणी व त्यामधुन कार्यवाहीकरीता अर्जदारांची निवड व नियुक्ती करण्याचे सर्वस्वी व अंतीम अधिकार त्याकरीता स्थापीत केलेल्या समितीस राहतील.

03/11/2025

प्रभारी सचिव,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अकोला

दिनांक:- **०३/११/२०२५.**
अकोला.
सहपत्र :- अर्ज नमुना.

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अकोला

जिल्हा न्यायालय परिसर, रेल्वे स्टेशनरोड, अकोला-४४४००१
दूरध्वनी क्र.०७२४-२४१०१४५, ई-मेल :akoladlsa@gmail.com,dlsaakola@gmail.com

अद्यावत फोटो

| | | |
|---|---|---|
| ०१ | संपुर्ण नांव | |
| ०२ | संपुर्ण स्थायी पत्ता | |
| ०३ | मोबाईल क्रमांक (हॉटसॲप नंबर असणे आवश्यक) | |
| ०४ | ईमेल आय.डी (असणे आवश्यक) | |
| ०५ | शैक्षणिक पात्रता | |
| ०६ | जन्म तारीख | |
| ०७ | संस्था/सामाजीक संस्थेचे/राजकीय पक्ष यांचे सभासद आहात काय ? असल्यास माहिती. | |
| ०८ | आपले विरूध्द फौजदारी गुन्हा किंवा प्रकरण कोणत्याही न्यायालयात दाखल किंवा प्रलंबीत आहे काय? असल्यास त्याचा तपशिल. | |
| ०९ | अधिकार मित्र/विधी स्वयंसेवक म्हणुन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण वेळोवेळी ठरवेल त्या मानधनावर काम करण्यास तयार आहे किंवा नाही ? | |
| १० | अधिकार मित्र/विधी स्वयंसेवक कोणत्या, जिल्हास्तरावर किंवा तालुका स्तरावर काम करण्यास तयार आहे. तो जिल्हा किंवा तालुक्याचे नाव नमुद करावे. **(फक्त जिल्हा किंवा तालुका निवडावा)** | |
| १० | या आधी विधिस्वयंसेवक म्हणुन काम केले आहे का? | |
| ११ | सामाजीक कार्य अनुभव थोडक्यात माहिती. | |

## घोषणा (Declaration)

मी याव्दारे जाहीर करतो/करते की, वर नमुद संपुर्ण माहिती बरोबर असुन ती चुकीची/खोटी आढळुन आल्यास अधिकार मित्र/विधीस्वयंसेवक म्हणुन माझी नियुक्ती झाल्यास ती रद्द होण्यास पात्र ठरेल. व मी विधी सेवा प्राधिकरण, अकोला. या कार्यालयाच्या सर्व सूचना मा. जिल्हा न्यायालय,अकोला यांच्या संकेतस्थळावर वाचुनच अर्ज केला आहे.

अकोला.
दिनांक :-

सही
संपुर्ण नांव:- ------------------------------

संबधित सर्व कागदपत्रे सोबत जोडण्यात यावीत